| MHKO110004762026 | किरकोळ फौजदारी खटला क्र. ४५/२०२६ मधील नि.क्र. १ वरील आदेश<br><br>महाराष्ट्र शासन<br>वि.<br>विकास हिंदुराव मंडले |
|---|---|

सदर प्रकरणात अर्जदार विकास हिंदुराव मंडले यांनी त्यांचे मालकीची राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १ कोल्हापूर यांनी गु. र. नं. ३४/२०२६ मध्ये जप्त केलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस ड्रम मोटार सायकल त्याचा रजिस्ट्रेशन नं. एमएच-०९ सी.वाय. ०५५९ असून चेसीस नं. MBLHA1OAMDHE28374, इंजीन नं. HA10EJDHE32006 असे परत मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार यांचे कथनानुसार, प्रस्तुतचे कामी अर्जदार विकास हिंदुराव मंडले यांच्या मालकीची हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस ड्रम मोटार सायकल वाहन त्याचा रजिस्ट्रेशन नं. एमएच-०९ सी.वाय. ०५५९ असून चेसीस नं. MBLHA1OAMDHE28374, इंजीन नं. HA10EJDHE32006 राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १ कोल्हापूर यांनी दाखल केलेल्या गुन्हयाचे कामी जप्त केलेली आहे. सदर वाहन हे अर्जदार यांच्या मालकीचे असून यातील अर्जदार वाहनाचा दैनंदिन घरगुती कामासाठी तसेच इतर कामासाठी वापर करतात. सदरचे वाहन अर्जदार यांचे मालकीचे असून त्याच्याशी अन्य कोणाचा संबंध नाही. सदरचे वाहन पोलीस ठाणेच्या आवारात पडून राहिलेस तिचे उन, वारा, पाउस या पासून अतोनात नुकसान होणार आहे. सदर जप्त वाहन अर्जदार यांचे ताबेत दिलेस त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल अथवा फेरफार करणार नाही किंवा त्याची विक्री अगर तबदील करणार नाही असे कथन अर्जदार यांनी केले आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याबाबत विनंती अर्जदार करतात.

**०३.** निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १ कोल्हापूर यांनी त्यांचे म्हणणे दिलेले आहे. त्यांचे म्हणण्यानुसार, या प्रकरणातील आरोपी विकास हिंदुराव मंडले यांचेकडून बेकायदा हातभट्टी दारूची सदरच्या जप्त वाहनावरून वाहतूक करीत असताना मिळून आलेने सदर हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस ड्रम मोटार सायकल

त्याचा रजिस्ट्रेशन नं. एमएच-०९ सी.वाय. ०५५९ असून चेसीस नं. MBLHA1OAMDHE28374, इंजीन नं. HA10EJDHE32006 हे वाहन गावठी दारूसह जप्त करण्यात आले आहे. सदर वाहन हे अर्जदार विकास हिंदुराव मंडले यांच्या मालकीचे आहे. सदरचे वाहन परत केल्यास त्याचा वापर बेकायदा विनापरवाना बनावट अवैध मद्य विक्रीकरिता करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचे वाहन कार्यालयाचे आवारामध्ये नैसर्गिक आपत्तीपासून सुरक्षित आहे. सदर वाहन बेकायदेशीर कृत्यासाठी वापरण्यात आले असल्याने सरकार जमा होण्यासाठी आदेश करण्याची विनंती केली.

**०४.** अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील यांनी त्यांचे म्हणणे नि. २ वर दिलेले आहे. त्यांचे म्हणण्यानुसार, सदर मुद्देमाल हा अवैधरित्या दारू विक्री करण्यासाठी वापरण्यात आले आहे. अर्जदार याने अर्जासोबत मुद्देमाला बाबत विमा व सहा. अधीक्षक व्हेरीफाईड विमा, ड्रायव्हींग लायसन्स इत्यादी कागदपत्रे हजर केलेली नाहीत. अर्जदारास वाहन परत केलेस तो पुन्हा तशाच स्वरूपाचा गुन्हा करू शकतो. सदरचे जप्त वाहन अर्जदार यांच्या ताब्यात दिलेस ते तिचा वापर अशाच प्रकारच्या गंभीर स्वरुपाचा गुन्हा करणेसाठी वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच अर्जदार हे सदरचे वाहन सुनावणीकामी मे. न्यायालयात हजर करतील याची शाश्वती नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती सरकारी वकील करतात.

**०५.** प्रकरणाचे अवलोकन केले असता, अर्जदार यांनी सदर अर्जाचे कामी नि. ३ वरील यादीसोबत अनु.क्र. १ वर गु. र. नं. ३४/२०२६ ची एफ. आय. आर ची प्रत, अर्जदार यांचे आधारकार्ड प्रत, जप्त वाहनाचे आर. सी. बुक, अर्जदार यांचे पॅनकार्ड व जप्त वाहनाचे इन्शुरन्सचे कागदपत्र प्रत हजर केले आहेत. अर्जदाराने दाखल कागदपत्रांवरून जप्त वाहन हे अर्जदार यांच्या मालकीचे आहे हे प्रथमदर्शनी दिसून येते.

०६. ***सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य (ए आय आर २००३ एससी ६३८)*** यामध्ये मा. उच्च न्यायालय यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ नुसारचे अर्ज हे लवकरात लवकर निकाल करण्यासाठी व जप्त माल हा जास्त कालावधीसाठी ठेवण्यात येवू नये असे निर्देश नमूद केलेले आहे. फौजदारी प्रक्रिया

संहिता कलम ४५१ मधील तरतुदी या बी.एन.एस.एस.,२०२३ कलम ४९७ शी सुसंगत आहेत.

**०७.** अर्जदार यांनी व्यक्त केलेल्या साशंकता की, सदर वाहन तसेच जप्त राहिल्यास राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १ कोल्हापूर यांचे कार्यालय येथे उघड्यावरती पडून राहील. तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे सदरचे वाहन गंजून ते निकामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यामुळे अर्जदार यांचे नुकसान होणार आहे. सदर जप्त वाहन अर्जदार यांना त्यांचे व्यवसायासाठी जरूरीची असल्याने सदर वाहनाचा ताबा मिळणे आवश्यक व गरजेचे आहे या बाबी संयुक्तीक वाटतात. तसेच आजपर्यंत इतर कोणीही हजर राहून जप्त वाहनाची मागणी केलेली नाही. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १ कोल्हापूर यांनी प्रस्तुत अर्जास दिलेले म्हणणे विचारात घेतले. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १ कोल्हापूर व सरकारी अभियोक्ता यांनी सदर कामी त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे व सदरचे म्हणणे अर्जदाराच्या युजर मधून अपलोड केले आहे. त्यामुळे योग्य त्या अटी व शर्ती घालून जप्त मोटर कार परत देणे न्यायोचित होईल. वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालील आदेश पारीत करते-

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्ज योग्य त्या अटी व शर्तींवर मंजूर करण्यात येतो. |
| २. | राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १ कोल्हापूर यांना आदेशित करण्यात येते की, गु. र. नं. ३४/२०२६ मध्ये जप्त केलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस ड्रम मोटार सायकल त्याचा रजिस्ट्रेशन नं. एमएच-०९ सी.वाय. ०५५९ असून चेसीस नं. MBLHA1OAMDHE28374, इंजीन नं. HA10EJDHE32006 चा अंतरीम ताबा अर्जदार विकास हिंदुराव मंडले यांना रक्कम रू. ८०,०००/- (रक्कम रूपये ऐंशी हजार फक्त) चे हमीपत्र रक्कम रू. ५००/- चे नॉन ज्युडीशियल बॉडवर देण्यात यावे. |
| ३. | अर्जदाराने सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत सदर वाहन त्रयस्थ इसमास हक्क किंवा अधिकार निर्माण करू नये व अन्य |

| | |
|---|---|
| | कुठल्याही प्रकारे विल्हेवाट लावू नये किंवा त्यांच्या स्वरूपात बदल करू नये. |
| ४. | अर्जदाराने प्रकरणाच्या चौकशीसाठी जेव्हा जेव्हा सदर वाहनाची आवश्यकता असेल तेव्हा तेव्हा ती हजर करावी. वरील जप्त वाहन परत करताना राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १ कोल्हापूर यांनी त्याचा सविस्तर पंचनामा करावा. |
| ५. | अर्जदार याने वरील वाहनाचे चारही बाजूने छायाचित्र काढून वरील वाहन त्याच्या ताब्यात मिळाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत सदर प्रकरणी दाखल करावेत. |
| ६. | अर्जदाराने भविष्यात सदर वाहनाबाबत जर इतर कोणीही हक्क शाबित केल्यास तो त्यासाठी त्यांच्याप्रती सर्वस्वी जबाबदार राहील असे शपथपत्र सदर कामी दाखल करावे. |
| ७. | राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र. १ कोल्हापूर यांना पत्राद्वारे सुचित करण्यात यावे. |
| ८. | सदरचा आदेश, हमीपत्र, फोटो व पूर्ततेची कागदपत्रे दाखल करण्यात यावे. |

sd/-
**( आर. एस. मोरे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
पेठवडगाव.

दिनांक – ०१/०४/२०२६
पेठवडगाव.